नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३२५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १३ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - ज्ञानदेव नथ्थु नारखेडे,

वय - ५२ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - भालेगाव, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझी शेती भालेगाव येथे असून ती शेती दीड एकर आहे. बाकी साडेचार एकर शेती मी ठोक्याने केलेली होती. ती शेती मी तीन वर्षापूर्वी केलेली होती. त्यावेळी १५ क्वींटल कापूस झाला होता. त्यावर्षी सात हजार रूपये भाव होता. तो कापूस मी जग्गुला ९ हजार च्या भावाने विकला होता. जग्गु हा माझ्या सख्ख्या भावाचा मुलगा आहे. त्याने मला कापसाचे पैसे दिले नाही. त्याने मला ते पैसे एका महिन्याने देतो असे सांगितले, परंतु त्यानंतर त्याचा फोन बंद झाला. त्याच्याकडून कापसाचे १,३५,०००/- रूपये येणे होते. तो कापूस मी जग्गुला ४० दिवसाच्या करारावर दिला होता. तो कापूस मी नेमका कधी दिला होता हे मला सांगता येणार नाही. मी १,३५,०००/- रूपयांबाबत स्वतः फिर्याद दिलेली नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपी क्र.१ जग्गु याला ओळखतो. तो दृकश्राव्य पध्दतीने हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....**

०२. मी पोलीसांना बयाण देतेवेळी माझ्याकडे दीड एकर शेती असल्याचे व साडेचार एकरशेती ठोक्याने केल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी न्यायालयात आज पहिल्यांदा सांगत आहे. मी पोलीसांना तपासादरम्यान माझ्याकडे दीड एकर शेती आहे, हे दर्शविणारा सातबारा उतारा दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कापूस ज्यावेळी दिला जातो त्यावेळी मापा-यामार्फत मोजला जातो व त्याची काटापट्टी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्या काटेपट्टीची एक प्रत जो माल विकत आहे त्याला व जो माल विकत घेत आहे त्याला दिली जाते. मी पोलीसांना माझ्याकडे १५ क्वींटल कापूस मोजून दिल्याची

काटेपावती तपासादरम्यान दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आपल्या भागात जो कापूस पिकवला जातो तो सरकार मार्फत सीसीआयद्वारे विकत घेतल्या जातो. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी कापूस सीसीआयद्वारे विकत घेतल्या जातो. त्याचवेळी सीसीआयमार्फत त्याला चेक दिल्या जातो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर्षी सीसीआयचा भाव ९२००/- रूपये प्रति क्वींटल होता. मी पोलीसांना जबाब देतेवेळी तो कापूस मी जग्गुला ४० दिवसाच्या करारावर दिला होता असे सांगितले नव्हते. सदर बाब आज मी पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे.

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व जगनमध्ये संबंध नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गावातील राजकारणात मी व आरोपी वेगवेगळ्या गटातील पक्षाचे आहोत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी पोलीसांकडे खोटा जबाब देवून आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे शेती नसून मी असा कोणताही कापूस जग्गुला दिलेला नाही, त्यामुळे त्याचे मला १,३५,०००/- देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ व ३ यांचा सदर व्यवहाराशी कोणताही संबंध नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१२. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.10.28 17:52:05 +0530

दिनांक : २८/१०/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर